दिनांक - 19/12/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 203

विषय – स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषद विटा करिता घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता घेणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ - 1) मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरीक्षक यांची दिनांक 19/12/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) मा.राज्य अभियान संचालक स्वच्छ भारत मिशन यांचेकडील आदेश, MUDM/ SMM/ 1410/2022-23, 24/02/2023.

3) विटा नगरपरिषद प्रशासकीय ठराव क्र.155,दि.21/03/2023.

4) समर्थ इंजिनिअर्स, पुणे यांना दिलेला कार्यालयीन आदेश जा.क्र.4302, दि.21/03/2023.

5) समर्थ इंजिनिअर्स, पुणे यांनी आवक क्र.5496,दि.18/12/2023 अन्वये सादर केलेला सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR)

संदर्भ क्र.2 नुसार, स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 या अभियानांतर्गत मंजूर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्यासाठी संस्थांची विभागनिहाय नामिकासूची (Empanelmemnt) तयार करण्यात आली आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर नामिकासूचीतील संस्थांकडून घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेणेबाबत सूचना प्राप्त आहेत.

त्यानुसार संदर्भ क्र.3 अन्वये स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषद विटा करिता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार करणेकामी समर्थ इंजिनिअर्स, पुणे यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करणेबाबत प्रशासकीय ठराव करणेत आला आहे.

त्यानुसार संदर्भ क्र.4 अन्वये समर्थ इंजिनिअर्स, पुणे यांना मंजूर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करणेबाबत आदेश देण्यात आला होता.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.5 अन्वये समर्थ इंजिनिअर्स, पुणे यांनी सदर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल, अंदाजपत्रक व नकाशे सादर केले आहेत. सदर प्रकल्प अहवालाची नगरपरिषद स्तरावर छाननी करणेत आलेली आहे.

पान नं.2 वर

तरी सदर प्रकल्प सध्या अस्तित्वातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या ठिकाणी नवीन सर्व्हे नं.566/3 (जुना सर्व्हे नं.956/3) मध्ये राबविणेस व सदर सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) तांत्रिक मान्यता मिळणेकामी मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,सांगली यांचेकडे सादर करणे व त्याचे होणारे तांत्रिक तपासणी शुल्क अदा करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 19/12/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 204

विषय – सन 2023-24 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन भूमी येथील मशिनरी दुरुस्त करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी भांडार विभाग प्रमुख यांची दिनांक - 19/12/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2023-24 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन भूमी येथील मशिनरी दुरुस्त करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) बी.एल.पाटील ॲण्ड सन्स एन्टरप्रायजेस
2) वक्रतुंड इन्फ्रा ॲण्ड सर्व्हिसेस
3) इलेक्ट्रो ड्रीम्स टेक इंडिया

उपरोक्त ई निविदापैकी वक्रतुंड इन्फ्रा ॲण्ड सर्व्हिसेस अ.क्र.1.01, 1.03, 1.12, 1.13, 1.24, 1.71, 2.03, 2.37, 2.38 तसेच बी.एल.पाटील ॲण्ड सन्स एन्टरप्रायजेस अ.क्र.1.15, 2.39, 2.40, 2.41, 2.43, 2.44 वरील अ.क्र. व्यतिरिक्त इतर सर्व Item मध्ये इलेक्ट्रो ड्रीम्स टेक इंडिया यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. परंतू वक्रतुंड इन्फ्रा ॲण्ड सर्व्हिसेस व बी.एल.पाटील ॲण्ड सन्स एन्टरप्रायजेस यांनी ते L1 आलेले Item तांत्रिक अडचणीमुळे पुरवू शकत नसलेबाबत लेखी पत्राद्वारे कळविले आहे. तसेच इलेक्ट्रो ड्रीम्स टेक इंडिया यांनी वरील दोन्ही कंपन्यांचे L1 आलेले Item च्या दराप्रमाणे सदरचे काम करण्यास तयार असलेबाबत लेखी पत्राने कळविले आहे. तरी सदरची ई-निविदा इलेक्ट्रो ड्रीम्स टेक इंडिया यांची कमी दराचे असलेने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा